



रयत शिक्षण संस्थेचे,

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर.

मराठी विभाग २०२२-२३

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व प्रजासत्ताक दिन विशेषांक

## परिमल भित्तीपत्रक उद्घाटन

## अहवाल

दि.२६ जानेवारी २०२३

दि.२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्ताने व मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने ‘परिमल’ या भित्तीपत्रक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. ‘परिमल’ या भित्तीपत्रक अंकाचे मराठी विभागामार्फत नियमितपणे प्रकाशन केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये लिखाणाची आवड निर्माण व्हावी व विद्यार्थ्यांमधून चांगल्याप्रकारे साहित्य निर्माण व्हावे या हेतूने ‘परिमल’ चा अंक प्रकाशित केला जातो. महाविद्यालयाचे प्राचार्य मा.एल.डी.कदम यांच्या हस्ते या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रस्तुत अंकामधून मराठी भाषेचे महत्त्व सांगणारे लेख, कविता, चारोळ्या, विद्यार्थ्यांनी संग्रहित केलेल्या आहेत. तसेच प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून या अंकाचे प्रकाशन होत असल्याने या अंकाला एक विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या अंकाच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.कदम यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.व्ही.व्ही.किल्लेदार, उपप्राचार्या प्रा.डॉ.एस.जे.आवळे, सर्व विभागाचे विभागप्रमुख, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**परिणाम/निष्पत्ती**

- विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व लक्ष्यात आले.
- विद्यार्थ्यांना साहित्य लेखनाविषयी माहिती मिळाली.
- विद्यार्थ्यांमध्ये भाषेविषयी आवड निर्माण झाली.

**लाभार्थी**

**22**






**प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे**
**मराठी, विभाग प्रमुख**

प्राचार्य,
राजर्षि छ. शाहू कॉलेज,
कोल्हापूर.